# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि.७ मार्च,२०२०

## बातमी:-१

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आयोजित "प्रॉक्टीसिंग योगा" या ऑडिट कोर्सचा समारोप कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

विद्यापीठातील प्रशाळांमध्ये पसंतीवर आधारीत श्रेयांक पध्दतीअंतर्गत योगा विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक महिन्याच्या योगाभ्यास वर्ग घेण्यात आला. यामध्ये २८० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या वर्गाच्या समारोप समारंभाला अधिष्ठाता प्रा.ए.बी.चौधरी, प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार, प्रा.आर.एल.शिंदे, इंजि.एस.आर.पाटील, योगशिक्षक नेहा तळेले, योगेश भोळे, चित्रा महाजन, डॉ.लिना चौधरी उपस्थित होते. योगा विषयात पीएच.डी. प्राप्त केल्याबद्दल डॉ.देवानंद सोनार यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला.

यावेळी बोलतांना कुलगुरु प्रा.पाटील यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते योगा या विषयाकडे न पाहता शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी दररोज विद्यार्थ्यांनी योगा करावा. असे आवाहन केले. डॉ.देवानंद सोनार यांनी आपल्या भाषणात योगाचे महत्व विशद करतांना प्राचिन काळापासून योग भारतात अस्तित्वात असतांना आपण त्याकडे दुर्लक्ष केले या बद्दल खंत व्यक्त केली. चित्रा महाजन यांनी देखील यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन समन्वयक इंजि.आर.आय.पाटील यांनी केले.

---

## बातमी:-२

**जळगाव दि.७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि शिक्षणशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यामाने "आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा विकास" कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**

**गुरुवार दि.४ मार्च रोजी श्रीमती स्वाती सुर्यवंशी, सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास, यावल यांनी व्यक्तिमत्व विषयावर मार्गदर्शन केले. प्रा.रुपेश पाटील यांनी आपले विषय व्यासपीठावर कशा पध्दतीने मांडावा याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारतात माझे योगदान, आजचा युवक, व्यसन व तरुण, आजची लोकशाही, महापुरुषांना वाटून घेतले का?**, आजची शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी, लोकशाही ही खरचं लोकशाही आहे का? या विषयांवर आपले विचार मांडले. आत्मविश्वास व प्रेरणा कशी निर्माण करावी यावर विनोद ढगे यांनी पथनाट्य सादर केले.

कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांच्या हस्ते झाला. यावेळी मंचावर सहायक प्रकल्प अधिकारी श्रीमती स्वाती सुर्यवंशी, सामाजिकशास्त्र प्रशाळेच्या संचालिका डॉ.अर्चना देगावकर, विभाग प्रमुख डॉ.मनीषा इंदाणी, डॉ.संतोष खिराडे उपस्थित होते. यावेळी डॉ.मनिषा इंदाणी यांनी कार्यशाळेचा आढावा मांडला. समारोप प्रसंगी डॉ.नन्नवरे यांनी विद्यार्थी दशेत शिकत असतांना स्वावलंबी आणि कौशल्यपूर्ण झाले पाहिजे. आदिवासी विद्यार्थ्यांनी आपआपल्या गावात सामाजिक विकासासाठी प्रयत्न करावे असे सांगीतले. सुत्रसंचालन डॉ.धमेंद्र जाधव यांनी केले.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी